# झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण

परिपत्रक ३७

क्र.झोपुप्रा/सं.क्र.४०२/२०००/उजि/४०६
५वा मजला, गृहनिर्माण भवन,
वांद्रे(पूर्व), मुंबई-४०० ०५१.
दिनांक :- १०.२.२०००

## परिपत्रक

विषय:- झोपडपट्टी पुनर्वसन योजना
झोपडीधारकांच्या पात्रतेबाबत करावयाची कार्यवाही...

बृहन्मुंबईत सुरू असलेल्या झोपडपट्टी पुनर्वसन योजनेमध्ये सदनिका मिळण्यासाठी पात्रता ठरविण्याबद्दल प्राधिकरणाकडे बरीच निवेदन/अर्ज प्राप्त होतात व असे अर्ज ज्या योजना जुन्या आहेत व काही ठिकाणी इमारतीचे बांधकाम सुरू आहे त्या ठिकाणीच्या झोपडपट्टी पुनर्वसन योजनेमध्ये ही पात्रता ठरविण्यासाठी निवेदने प्राप्त होतात. काही झोपडीधारकांना अशी योजना सुरू करून त्याची अंमलबजावणी ते राहत असलेल्या झोपडीपट्टीमध्ये करण्यात येणार आहे याचीही माहिती नसते व झोपडीधारक अंधारात राहतात व प्रत्यक्ष झोपडया हलविण्यास सुरूवात झाल्यावरच त्यांना याची माहिती होते व नंतर पात्रतेसाठी प्राधिकरण/ न्यायालये इत्यादी संस्थेकडे धाव घेतली जाते. अश्याप्रकारे योजनेची सुरूवात योग्य रितीने होत नसल्याने कालांतराने योजनेत अडथळा उत्पन्न होतो. तसेच योजनेत समावेश करावयाच्या झोपडीधारकांबाबत निश्चित संख्या उपलब्ध न झाल्याने वारंवार योजनेत बदल करणे भाग पडते. अश्या सर्व बाबींना आळा बसावा व अर्ज प्राप्त होण्याची संख्या जास्तीत जास्त किमान असावी यासाठी उपयायोजना करण्याचे विचाराधिन होते. यास्तव याबाबत पुढील प्रमाणे पध्दती अनुसरण्यात यावी असे मान्य करण्यात येत आहे.

☞ ज्या झोपडपट्टी पुनर्वसन योजनेमध्ये परि-२ पात्रता यादीत अद्याप द्यावयाची आहे त्यामध्ये सक्षम अधिकाऱ्याकडून परि-२ प्राप्त झाल्यावर उपजिल्हाधिकारी, झोपुप्रा हे परि-२ ची एक प्रत संबंधित सहकारी संस्थेस पाठवितील व ती यादी विहित सुचनेसह संस्थेच्या कार्यालयात/ जागेवर प्रसिध्द करण्याबद्दल कळवितील व प्रसिध्दीचा अहवाल प्राप्त करून घेतील.

☞ विहित सूचनेव्दारे संबंधित झोपडपट्टी पुनर्वसन योजनेच्या क्षेत्रातील जे झोपडीधारक अपात्र असतील अथवा ज्यांचा समावेश करण्यात आला नसेल अथवा निवासी-नि-व्यापारी अथवा निवासी ऐवजी व्यापारी गाळयासाठी पात्र करण्याबद्दल मागणी असेल तर असे झोपडीधारक नोटीस प्रसिध्द झाल्यापासून १ महिन्यात प्राधिकरणाकडे निवेदने योग्य त्या कागदपत्रासह सादर करतील.

☞ विहित मुदतीत सादर होणाऱ्या निवेदनांचाच फक्त विचार केला जाईल व त्यानंतर पात्रतेसंबंधित कोणताही निवेदनाचा विचार होणार नाही.

☞ ज्या झोपडपट्टी पुनर्वसन योजनेमध्ये परि-२ पूर्वीच निर्गमित करण्यात आले आहे. त्यामध्येही वरील प्रमाणे कार्यवाही करण्यात येईल व तशी कार्यवाही होईपर्यंत IOA दिले जाणार नाही.

☞ ज्या झोपडपट्टी पुनर्वसन योजनेमध्ये LOI, IOA देण्यात आले आहे त्यामध्येही प्रथम वरील प्रमाणे कार्यवाही करण्यात येईल व अंतिम निर्णय होईपर्यंत प्रमाणपत्र (CC)दिले जाणार नाही.

☞ वरील परिपत्रकानुसार करावयाची अंमलबजावणी सचिव/प्राधिकरण यांच्या देखरेखीखाली केली जाईल.

सही/
(गौतम चॅटजी)
मुख्य कार्यकारी अधिकारी